जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -१५३ दिनांक - ०१/०३/२०२४**

दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक - २, गुन्हे शाखा,पुणे शहर

**खुनाचे गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा असलेला व पॅरोल रजेवर आल्यानंतर फरार झालेल्या आरोपीला ०१ गावठी बनावटीची पिस्टल, ०३ जिवंत काडतुसे सह केले जेरबंद**

दि.२९/०२/२०२४ रोजी दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक-२ चे अधिकारी व अंमलदार हडपसर, वानवडी व कोंढवा पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रात गस्त घालत असताना पोलीस अंमलदार दत्तात्रय खरपुडे यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, शिवानंद हॉटेल जवळील, साई गादी कारखाना समोर, खराडी, पुणे येथे अहमदनगर विसापूर जेल मधील पॅरोल रजेवर सुटलेला व पॅरोल रजा संपलेली असताना पुन्हा जेल मध्ये हजर न झालेला एक आरोपी इसम हा कात्रज-कोंढवा नविन काम चालु असलेल्या रोडवरील हॉट मिक्स प्लँट जवळ, कोंढवा, पुणे येथे पिस्टल विक्री करण्याकरीता कोणाची तरी वाट पाहत थांबलेला आहे.

त्याप्रमाणे वरिष्ठ अधिकारी यांचे आदेशाप्रमाणे सदर ठिकाणी जावुन, शिताफीने सदर इसमांना ताब्यात घेवुन,त्यास त्याचा नाव व पत्ता विचारता त्याने त्याचे नाव व पत्ता **प्रदीप ऊर्फ शप्पु जर्नादन कोकाटे,वय ३४ वर्षे,रा.वाघ मळा, करंदीकर हॉस्पीटल शेजारी, विठ्ठलवाडी, अहमदनगर** असे असल्याचे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता त्यांचे कब्जात ०१ गावठी बनावटीचे पिस्टल व ०३ जिवंत काडतुसे असा एकुण ४०,६००/- रु. किं.चा माल मिळुन आल्याने त्यांचेवर कोंढवा पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा रजि. नं. २२५/२०२४ आर्म ॲक्ट कलम ३ सह २५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१)(३) सह १३५ प्रमाणे दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार, मा. सह पोलीस आयुक्त श्री. प्रविण पवार, मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री. अमोल झेंडे, मा. सहा पोलीस आयुक्त गुन्हे-२ श्री. सतिश गोवेकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. अजय वाघमारे, सहा. पोलीस निरीक्षक विवेक पाडवी, व पोलीस अंमलदार दत्तात्रय खरपुडे, विनायक रामाणे, दिनकर लोखंडे, गणेश लोखंडे, राहुल इंगळे, सुदेश सपकाळ यांनी केली आहे.